# सृष्टिज्ञान

**संस्थापक :**
कै.प्राचार्य गो. रा. परांजपे
कै. डॉ. दि. धों. कर्वे
कै. प्रा. स. बा. हुदलीकर

**मार्गदर्शक :**
डॉ. रघुनाथ माशेलकर
डॉ. अनिल काकोडकर
डॉ. विजय भटकर
डॉ. शेखर मांडे

**सल्लागार :**
ले. ज. डॉ. माधुरी कानिटकर (निवृत्त)
डॉ. भूषण पटवर्धन

**संचालक :**
डॉ. योगेश शौचे
डॉ. मानसी माळगांवकर
डॉ. क. कृ. क्षीरसागर
श्री. र. वि. कुलकर्णी

**संपादक :** रमेश दाते
**सहसंपादक :**
डॉ. प्रभाकर इंगळे, सत्यजित जोशी
**मुखपृष्ठ मांडणी व सजावट :**
मिलिंद जोशी, अनुपम क्रिएशन्स, पुणे

या अंकाची किंमत : रु. ५०.००
वार्षिक वर्गणी : रु. ५००.००

**पत्रव्यवहाराचा पत्ता :**
'सृष्टिज्ञान', c/o विज्ञान भारती
काशी निवास, सुभाषनगर गल्ली क्र.६,
१२६१ शुक्रवार पेठ, पुणे ४११००२.
फोन नं.: ०२०–२४४७४२९५
ई–मेल : sci.vibha@gmail.com

या अंकातील लेख त्या त्या विषयांतील तज्ज्ञांनी लिहिलेले आहेत. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.


## विज्ञान चळवळ लोकाभिमुख होण्यासाठी

इंडिया इंटरनॅशनल सायन्स फेस्टिव्हल २०२३ ही भारतीय विज्ञान क्षेत्रातील या वर्षातील सर्वात मोठी घटना आहे. ती १७ ते २० जाने. २०२३ मध्ये फरिदाबाद, हरयाना येथे पार पडली. या भव्य प्रदिर्शनीचा हेतू हा सर्वसाधारण नागरिकांच्या समुहात, अगदी विद्यार्थी, शिक्षक, वैज्ञानिक, संशोधक, उद्योगक्षेत्रातील व्यवसायिक, उद्योजक व विज्ञानक्षेत्रातील पत्रकार, या सर्वांमध्ये विज्ञान प्रसार करणे व वैज्ञानिक दृष्टिकोन वाढीस लागणे हा होता. याचे आयोजन माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय, पृथ्वी विज्ञान मंत्रालय व विज्ञानभारती यांनी केले. या वर्षीच्या उपक्रमाचे ध्येय 'अमृत काळात' विज्ञान व तंत्रज्ञान सर्व सामान्य नागरिकांपर्यंत नेणे हे होते. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव पार केल्याने या काळास 'अमृत काळ' संबोधले आहे.

देशभरातील लहानमोठ्या आधुनिक, प्रयोगशाळांमंध्ये मोठ्या जोमाने विविध विषयांवर संशोधन होत आहे. प्रयोगशाळांच्या बंदिस्त जागेत शोधलेले नवे गुणकारी औषध, किंवा एखादे उपयुक्त उपकरण किंवा एखादे मुलभूत वैज्ञानिक संशोधन केवळ वैज्ञानिकांपुरतेच मर्यादित राहिले, आणि सर्वसामान्य जनतेपुढे आले नाही, तर ते जनतेवर अन्याय केल्यासारखेच होईल. याबरोबरच नवे संशोधन लोकांपर्यंत योग्य प्रकारे पोहोचले तरच संशोधकांच्या कष्टाचे खरे चीज होत असते. अखेर संशोधनाचे पर्यवसान सर्वसामान्यांच्या आयुष्यात चांगले बदल घडवून आणण्यात व्हायला हवे. सर्वसामान्यांचे आयुष्य अधिक सुकर होण्यास संशोधनाचा हातभार लागला पाहिजे. त्यांच्या दैनंदिन अडचणी कमी व्हायला मदत व्हायला पाहिजे. यासाठी संशोधनाचे विषयही नेमके निवडायला हवेत. उपयुक्त संशोधन वाचकांपर्यंत नेण्याच्या कामात सृष्टिज्ञान खारीचा वाटा उचलणार आहे. विविध संशोधन संस्थांची माहिती व विशेषत: तेथे होत असलेले संशोधन लोकांसमोर आणण्याच्या हेतूने या महिन्यात लोणावळा येथील मनशक्ती संशोधन केंद्रातील संशोधनाची माहिती दिली आहे. मनावर

SRISHTIDNYAN (RNI No. 21321/1973)
"Srishtidnyan" Monthly magezine owned by Vidnyan Bharati, Pune, Printed and published by Ramesh Date. Printed at Pratima Mudran, Kothrud Industrial Area, Kothrud, Pune - 411038. Published at 1261, Shukrawar Peth, Subhashnagar, Pune - 411002.
Editor - Ramesh Date

संशोधनातील एक महत्वाचा संदर्भग्रंथ म्हणजे समर्थ रामदास स्वामी यांचे 'मनाचे श्लोक' जगतगुरु तुकोबाराय यांनीही मनावरील संशोधनास फार मोठे महत्व दिले होते. 'मन' हेच सर्वश्रेष्ठ दैवत आहे त्याला प्रसन्न ठेवल्यास मानवांच्या सर्व समस्यांचे निराकरण होईल, असे त्यांनी आवर्जून म्हटले आहे. संत शिरोमणी ज्ञानेश्वर महाराजांनी म्हटले आहे की, प्रसन्न चित्ताने सर्व संसार दुःख नष्ट होईल. मनावरील संशोधनाचे असे महत्व असल्याने मनावर संशोधन करणाऱ्या संस्थेच्या माहितीपासून आपण प्रारंभ करीत आहोत.



*मन करारे प्रसन्न । सर्व सिध्दीचे कारण ।*
*मोक्ष अथवा बंधन । सुख समाधान इच्छाते ।।*
*मनें प्रतिमा स्थापिली । मने मना पूजा केली ।*
*मने इच्छा पुरविली । मन माऊली संकलांची ।।*
*प्रसन्न आप–आपणास । गति अथवा अधोगती ।*
*साधक, वाचक, पंडित । श्रोते, वदते, ऐका मात।।*
*नाही नाही अनुदैवत । तुका म्हणे दुसरे।।*

*–जगत्‌गुरु तुकोबाराय*

यापुढे अशा विविध संस्थांतील संशोधन नियमितरित्या मांडले जाणार आहे. या 'इंडिया इंटरनॅशनल सायन्स फेस्टिव्हल' नंतर लगेचच या फेब्रुवारी महिन्यात दुसरी राष्ट्रीय महत्वाची घटना – 'राष्ट्रीय विज्ञान दिन' २८ तारखेच साजरी होणार आहे. भारतरत्न चंद्रशेखर व्यंकटरमण (सी.व्ही.रामन या नावाने अधिक परिचित) यांना त्यांच्या नोबेल पारितोषिक विजेत्या संशोधनाची संकल्पना या दिवशी सुचली त्याच्या स्मरणार्थ आपण दरवर्षी 'राष्ट्रीय विज्ञान दिन' साजरा करतो. या वर्षीच्या विज्ञान दिनामागील प्रेरणासूत्र – ''वैश्विक हितासाठी वैश्विक विज्ञान' असे आहे.

याठिकाणी नमूद करावेसे वाटते की, भारतीय विज्ञान – भारतात विकसित झालेले पारंपारिक विज्ञान – हे 'विश्वहिताय' हेच सूत्र डोळ्यासमोर ठेवून विकसित झाले आहे. याची पावती आता 'पतंजली योग' ही जीवनपध्दती मोठ्या प्रमाणावर जागतिक स्तरावर स्विकारली गेली आहे, त्यातून मिळते. या अंकातील 'बहुपयोगी गुग्गूळ' व आयुर्वेदोक्त अग्निसंस्कार भाग–२, या दोन लेखांमध्ये याचीच परत प्रचिती येईल.

आपण या वर्षभर 'कौशल्येविकास' या विषयावरील प्रगती मांडणार आहोत. त्यामुळे 'कौशल्य काही पैलू' व अन्य काही लेख या महिन्यात आहेतच

**– रमेश दाते**

sci.vibha@gmail.com

**निवेदन**

सृष्टिज्ञान च्या वर्गणी संदर्भात. गेली ५ वर्षे, सृष्टिज्ञान ची वार्षिक वर्गणी ४००/– आहे. मासिक निर्मितीतील सततच्या वाढत्या खर्चामुळे, सृष्टिज्ञान मासिकाची वार्षिक वर्गणी ५००/–रू. करण्यात येत आहे. द्विवार्षिक वर्गणी १०००/– रू. राहील.

पोस्टाने अंक वेळेत मिळत नसल्याचे निदर्शनास आल्याने, कूरियर चा पर्याय ठेवावा लागत आहे. ज्यांना कूरियरने अंक हवा आहे, त्यांचेसाठी दरवर्षी ३५०/–रू. ज्यादा आकारले जातील. कूरियर खर्चासह वार्षिक वर्गणी ८५०/– रू असेल.

नाईलाजाने घेत असलेल्या या निर्णयाला सर्व वर्गणीदारांनी सहकार्य करावे, ही नम्र विनंती.

– संपादक, सृष्टिज्ञान मासिक.

SRISHTIDNYAN (RNI No. 21321/1973)
'सृष्टिज्ञान' हे मासिक मालक विज्ञान भारती पुणे यांचे साठी मुद्रक व प्रकाशक रमेश दाते यांनी प्रतिमा मुद्रण, कोथरुड इंडस्ट्रियल एरिया, कोथरुड, पुणे ४११०३८ येथे छापून विज्ञान भारती १२६१ शुक्रवार पेठ, काशी निवास, सुभाषनगर, गल्ली क्र.६, पुणे ४११००२ येथे प्रसिध्द केले.
संपादक : रमेश दाते